| | | |
|---|---|---|
| ७ | **वेतनवाढ स्थगीती विरुध्द अपील करणे.** | |
| | महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम २९ मध्ये नमूद केल्यानुसार नियम ३१ च्या खंड (१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे किरकोळ शिक्षा लादण्याच्या निर्णयामुळे एखाद्यावर अन्याय झाला आहे असे वाटणाऱ्या, खाजगी शाळेतील एखाद्या कर्मचाऱ्यास, शिक्षेबाबत आदेश मिळाल्याच्या तारखेपासून ४५ दिवसांच्या आत, शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ या कार्यालयाकडे अपील दाखल करता येते. या अपीलाची या कार्यालयीन स्तरावर सुनावणी घेऊन अपीलाचा निर्णय संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, संस्था अध्यक्ष/सचिव, संबंधित शाळेचा मुख्याध्यापक व अपीलकर्ता यांना कळविला जातो. | |
| | **महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ३१ (१) नुसार किरकोळ शिक्षा खालीलप्रमाणे आहेत.** | |
| | १ | खरडपट्टी काढणे. |
| | २ | ताकीद देणे. |
| | ३ | ठपका ठेवणे. |
| | ४ | जास्तीत जास्त एक वर्ष एवढ्या कालावधीसाठी वेतनवाढ रोखून ठेवणे. |
| | ५ | हयगय किंवा आदेशांचा भंग यामुळे संस्थेला सोसावे लागलेले संपूर्ण आर्थिक नुकसान किंवा अशा नुकसानाचा कोणताही भाग, वेतनातून किंवा त्याला देय असेल अशा रकमेतून वसूल करणे. |